


# डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजमध्ये कार्यशाळा संपन्न

**जयसिंगपूर/प्रतिनिधी–**

डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर येथे प्रख्यात कंपनी प्रॉक्टर अँड गॅम्बल यांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी निधी अंतर्गत 'कर लो सफलता मुठ्ठी मे' ह्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुरज जावळेकर (जिल्हा व्यवस्थापक/प्रशिक्षक) यांनी विद्यार्थ्यांना यशाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रो. विनोद पाटील यांच्या प्रास्ताविकाने झाली. उपप्राचार्य डॉ. सतीश किलजे व डिप्लोमा फार्मसी विभाग प्रमुख सौ. सोनाली मगदूम यांनी पाहुण्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन केले.

या कार्यक्रमामध्ये तुमचा आत्मविश्वास, शरीराची भाषा आणि प्रभावी संवादया सारख्या अत्यंत उपयुक्त आणि आवश्यक विषयांवर मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. श्री. सुरज जावळेकर यांनी संवाद कौशल्य, आत्मविश्वास, आणि व्यावसायिक वर्तन यांचे प्रत्यक्ष उदाहरणासह सादरीकरण केले. विद्यार्थ्यांना त्यांनी सकारात्मक दृष्टिकोन बाळगण्याचे आणि सातत्याने प्रयत्न करण्याचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी प्रॉक्टर अँड गॅम्बल कंपनीतर्फे विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप व स्टायपेंड संधी जाहीर करण्यात आली, यामध्ये विध्यार्थ्यांना दोन महिन्या करिता औषधनिर्माण कंपनी मध्ये ६,५००/- रुपये स्टायपेंड मिळण्याची संधी उपलब्धकरून दिली ही बाब विद्यार्थ्यांसाठी विशेष महत्वाची ठरली.

या उपक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शीतलकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले आणि त्यांनी अशा प्रकारचे विद्यार्थी केंद्रित उपक्रम कॉलेजमध्ये भविष्यातही राबवले जातील, असे सांगितले. तसेच संस्थेचे चेअरमन डॉ. विजय मगदूम आणि व्हाईस-चेअरपर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदूम यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजचे प्रशिक्षण आणि नियुक्ती विभाग प्रमुख प्रा. विनोद पाटील व प्रा. अनुजा किचडे यांनी केले.